चोरी चोरीच्या चोरीचा इतिहास

राज कपूर-नरगीस जोडीचा चोरी चोरी खूप गाजला. त्यावरून पुढे आणखी काही चित्रपट बनले. पण मूळ चोरी चोरीसुद्धा एका हिट इंग्रजी चित्रपटाच्या कथेवरून चोरण्यात आला होता...

□ इसाक मुजावर




*चोरी चोरी*मध्ये नरगीस-राजची ही रोमँटिक अदा शेवटचीच पहायला मिळाली.

गोष्ट आहे १९९१ची. आमीर खान-पूजा भट्ट यांची भूमिका असलेला महेश भट्ट दिग्दर्शित *दिल है के मानता नहीं* हा चित्रपट पडद्यावर आला होता तेव्हाची. राज कपूर व नरगीस यांची भूमिका असलेला मद्रासच्या ए.व्ही.एम.चा १९५६चा *चोरी चोरी* हा चित्रपट टीव्हीच्या कोणत्या तरी चॅनलवर तेव्हा दाखवला गेला. *दिल है के मानता नही*नंतर *चोरी चोरी* पाहणाऱ्या आजच्या पिढीतील काही मुलांकडून एक गमतीदार प्रतिक्रिया ऐकायला मिळाली. अरे, हा *चोरी चोरी* तर *दिल है के मानता नहीं*ची कॉपी आहे.

खरं सांगायचं तर *दिल है के मानता नहीं*च *चोरी चोरी*ची कॉपी होती आणि *चोरी चोरी*देखील तसा ओरिजनल नव्हता. ग्रेगरी पेक व ऑड्रे हेपबर्न यांची भूमिका असलेला एक इंग्रजी चित्रपट त्या काळात आला होता *रोमन हॉलिडे*. *चोरी चोरी* या *रोमन हॉलीडे*ची कॉपी होती. *दिल है के मानता नही*देखील *रोमन हॉलीडे*चीच कॉपी होता. *दिल है के मानता नही*नंतर १९९४ला ऋषी कपूर आणि तब्बू यांची भूमिका असलेला *पहला पहला प्यार* हादेखील *रोमन हॉलीडे*चीच कॉपी होती. तो फारसा चालला नाही. *दिल है के मानता नही* मात्र हिट ठरला. १९५६चा *चोरी चोरी*देखील हिट होता. राज कपूर व नरगीस या दोघांची जोडी त्या काळातील एक लोकप्रिय जोडी होती. १९४८च्या *आग* या चित्रपटातून पडद्यावर पहिल्यांदा आलेली ही हिट जोडी १९५६च्या *चोरी चोरी*नंतर फुटली. *चोरी चोरी*नंतर त्या दोघांची भूमिका असलेला *जागते रहो* हा आर.के.चाच आणखी एक चित्रपट १९५६ला पडद्यावर आला. पण त्यात ते नायक-नायिका नव्हते. या चित्रपटातील राज कपूरची भूमिका नायिकाविरहित होती. नरगीस या चित्रपटाच्या शेवटी 'जागो मोहन प्यारे...' या एकाच गाण्यात पाहुणी कलाकार म्हणून पडद्यावर दिसली होती. यामुळे नायक-नायिका म्हणून त्या दोघांच्या जोडीचा शेवट *चोरी चोरी*तच झाला.




*दिल है के मानता नहीं*मध्ये पूजा भट्ट-आमीर

प्रत्येक हिंदी चित्रपटात खलनायक असतो आणि चित्रपटातील अनेक प्रसंगात तो व नायक आमने सामने येतात. *चोरी चोरी* मात्र याला अपवाद होता. या चित्रपटातला खलनायक प्राण आणि राज कपूर यांना आमने सामने आणणारा एकही सीन नव्हता.

*चोरी चोरी*चं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अनेक विनोदी कलाकार या चित्रपटात एकत्र आले होते. हास्य अभिनेता गोपने यात नरगीसच्या श्रीमंत पित्याची भूमिका केली होती. *चोरी चोरी*नंतर *सजनी, नया अंदाज, बारीश, नाईट क्लब*सारख्या काही चित्रपटांत तो दिसला. पण *चोरी चोरी*च खऱ्या अर्थाने त्याचा शेवटचा महत्त्वपूर्ण चित्रपट. त्यानंतर वर्षभरातच १९५७ साली हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिकपणे त्याचे निधन झाले. *दिल है के मानता नही*मध्ये *चोरी चोरी*मधील गोपची भूमिका अनुपम खेरने केली होती. त्यासाठी फिल्मफेअरच्या सर्वश्रेष्ठ विनोदी अभिनेत्याच्या पारितोषिकासाठी त्याच्या नावाची

शिफारस झाली होती. पण हे पारितोषिक काही *दिल है के मानता नहीं*मधील भूमिकेसाठी न मिळता नंतर *लम्हें*तील भूमिकेसाठी मिळालं.

*चोरी चोरी*च्या काळात फिल्मफेअरच्या पारितोषिकात विनोदी अभिनेत्याचं पारितोषिक नव्हतं. असतं तर या चित्रपटातील भूमिकेसाठी गोपच्या नावाची शिफारस नक्कीच झाली असती. इतकी या चित्रपटातील त्याची भूमिका लाजवाब होती. त्याच्याबरोबर भगवान, जॉनी वॉकर, मुकरी हे आणखी तीन हास्यअभिनेते *चोरी चोरी*त होते आणि त्यांच्याबरोबर राजा सुलोचना व इंदिरा बंसल या दोन हास्यअभिनेत्री. या हास्यकलाकारांपैकी गोप व मुकरी या दोघांचा अपवाद वगळता अन्य हास्यकलाकारांच्या तोंडी गाणं होतं हे या चित्रपटाचं आणखी एक ठळक वैशिष्ट्य. यातलं रफीने गायलेलं 'ऑल लाईन क्लिअर, आगे बढो, आगे चलो,. छोटी सी ये अलटन पलटन...' हे गाणं जॉनी वॉकर व इंदिरा बन्सल यांच्यावर तर 'तुम अरबों का हेरफेर करनेवाले, रामजी, सवा लाख की लॉटरी दे दे अपने नाम जी...' हे गाणं भगवानदादा व राजा सुलोचना यांच्यावर चित्रित करण्यात आलं होतं. रफीचा आवाज



ज्या इंग्रजी चित्रपटावरून *चोरी चोरी* बनवला होता त्याचीच आणखी एक हिंदी आवृत्ती *पहला पहला प्यार*मध्ये ऋषी-तब्बू

या चित्रपटात हास्यकलाकारांच्या गाण्यापुरताच मर्यादित ठेवण्यात आला होता. या चित्रपटापासून मन्ना डे राज कपूरचा आवाज बनून गेला. तो राज कपूरसाठी पहिल्यांदा *आवारा*त गायला, त्यानंतर *श्री ४२०*साठी. मुकेशबरोबर राज कपूरसाठी गाणारा एक आवाज हेच आपल्या चित्रपट संगीतातील तेव्हा त्याचं स्थान होतं. पण *चोरी चोरी*त मात्र त्याचा आवाज मुकेशच्या आवाजाला उणे करून पूर्णपणे राज कपूरचा आवाज बनून गेला होता. मुकेश तेव्हा निर्माता-नायक व संगीतकार बनून *अनुराग* या चित्रपटाची निर्मिती करीत होता. या चित्रपटाच्या व्यापामुळे इतरांची गाणी गायला तेव्हा त्याला वेळच मिळत नव्हता. राज कपूरसाठी गायचंदेखील काही काळ त्याने तेव्हा बंद केलं होतं. यामुळे *चोरी चोरी*चे संगीतकार शंकर-जयकिशन यांनी या चित्रपटात राज कपूरचं गाणं पूर्णपणे मन्ना डेमय करून सोडलं होतं. चित्रपटाच्या निर्मात्यांना ही गोष्ट न रुचल्याने त्यांनी रेकॉर्डिंगच्या वेळी मुकेशच्या आवाजाचा आग्रह धरून मन्ना डेच्या आवाजाला विरोध केला होता. पण शंकर जयकिशननी हा विरोध जुमानला नाही.

*चोरी चोरी*त मन्ना डेचं एकही सोलो गाणं नव्हतं. या चित्रपटातील 'ये रात भीगी भीगी, ये मस्त फिजाये...', 'आ जा मधूर चांदनी में हम...' व 'जहां मैं जाती हूं वही चले आते हो...' ही तीन गाणी मन्ना डेनी लताबाईंबरोबर गायली होती. या चित्रपटात एकूण नऊ गाणी होती आणि या गाण्यांपैकी रफीने गायलेल्या 'ऑल लाइन क्लिअर...' या गाण्याचा अपवाद वगळता अन्य आठ गाण्यात लताबाईंचा आवाज होता. तीन गाणी त्यांनी मन्ना डेबरोबर गायली होती. 'तुम अरबों का हेरफेर...' हे एक गाणे रफीबरोबर 'मन भावन के घर जाए गोरी...' हे नृत्यगीत आशाबाईंच्याबरोबर 'ओ टिमका... टिमा उस पार साजन...', 'पंछी बनू उडती फिरू मस्त गगन में...' व 'रसिक बलमा...' ही तीन गाणी लताबाईंनी एकटीने गायली होती. या गाण्यांपैकी 'रसिक बलमा...' या गाण्याची एक आठवण सांगण्यासारखी आहे. *चोरी चोरी*चं संगीत सर्वत्र लोकप्रियता मिळवत होतं तेव्हा निर्माते-दिग्दर्शक मेहबूब खान एकदा आजारी पडले होते आणि औषधोपचारासाठी त्यांना इंग्लंडच्या एका इस्पितळात दाखल करण्यात आलं होतं. तेथे एका रात्री त्यांना काहीसं अस्वस्थ वाटू लागलं. त्या अस्वस्तावस्थेतच इंग्लंडहून मुंबईला त्यांनी लताबाईंना फोन लावला. फोनवर ते त्यांना म्हणाले, 'मुली, आजारपणामुळे मी काहीसा बेचैन झालोय. माझी ही बेचैनी दूर करण्यासाठी तू 'रसिक बलमा...' हे तुझं गाणं मला फोनवर ऐकव. ते ऐकल्यावर माझी बेचैनी कमी होऊन मला काहीसा आराम पडेल.'

मेहबूब खान यांची ही विनंती ऐकून लताबाईंनी 'रसिक बलमा...' हे गाणं त्यांना फोनवर ऐकवलं आणि ते ऐकल्यावरच त्यांना काहीसा आराम पडला. *चोरी चोरी*मधील शंकर-जयकिशन यांच्या संगीताचा प्रभाव हा असा जबरदस्त होता आणि या चित्रपटाच्या संगीतासाठी त्यांना १९५६चा फिल्मफेअरचा सर्वश्रेष्ठ संगीतकाराचा पुरस्कार मिळाला होता. *चोरी चोरी, अनाडी, दिल अपना और प्रीत पराई, प्रोफेसर, सूरज, ब्रह्मचारी, मेरा नाम जोकर, बेईमान*साठी शंकर-जयकिशनना एकूण नऊ वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. त्यांच्या या फिल्मफेअर पुरस्काराची सुरुवात केली *चोरी चोरी*ने. हसरत व शैलेंद्र या चित्रपटाचे गीतकार होते. 'तुम अरबों का हेरफेर...', 'ये रात भीगी भीगी...', 'जहां मैं जाती हूं...', 'मनभावन के घर जाए गौरी...' ही या चित्रपटातील चार गाणी शैलेंद्रनी लिहिली होती व बाकीची पाच गाणी हसरतनी.

ए. व्ही. एम.ने *चोरी चोरी* निर्माण केला असला तरी हा चित्रपट पूर्णपणे ए. व्ही. एम.चा नव्हता. *अनुराधा, अनाडी* या चित्रपटांचे निर्माते एल. बी. लछमन यांनी निर्मिती क्षेत्रात स्वतंत्रपणे पाऊल टाकण्यापूर्वी ए. व्ही. एम.च्या बॅनरखाली हा चित्रपट निर्माण केला होता. अनंत ठाकूर या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. *चोरी चोरी*च्या आधी त्यांनी *पारस, पगडी* यासारख्या काही चित्रपटांचं दिग्दर्शन केलं होतं आणि *चोरी चोरी*नंतर *सुपरमॅन*सारख्या एकदोन चित्रपटांचं. १९६६ला त्यांनी एक मराठी चित्रपट दिग्दर्शित केला होता *पवनाकाठचा धोंडी*. पण *चोरी चोरी*चं यश त्यांच्या अन्य कोणत्याही चित्रपटाला मिळालं नाही. यामुळे आज ते विस्मृतीत गेलेले एक दिग्दर्शक बनले आहेत. पण *चोरी चोरी* मात्र विस्मृतीत गेला नाही. आजही अनेकांना आठवणारा चित्रपट म्हणून या चित्रपटाची आठवण मागे उरलीय.